म. ग्रं. सं. ठाणें
ग्र
क्र.
RLEBK-0004[illegible]

# भारताचार्य नानासाहेब वैद्य.



REFBK-0004388

ले. धुंडिराज त्र्यंबक गद्रे

कल्याण.

किं २ आणे.

स्थ ... ग्रंथ संग्रहालय
क्र. ४३८८

# भारताचार्य नानासाहेब वैद्य.

चरित्रलेखन आणि चित्रकला यांचें फार साम्य आहे असें म्हणतात. चित्रकलेंतील मॉडेल ड्राइंगची उपमा जिवंत व्यक्तींबद्दलच्या लेखनास समर्पकपणें लागू पडते. मॉडेल ड्राइंगमध्यें ज्याप्रमाणें आपणांस अवघड वाटणारी बाजू शिताफीनें टाळून चित्र काढतां येतें त्याचप्रमाणें जेव्हां जेव्हां चरित्रलेखनाशीं जिवंत व्यक्तींचा संबंध येतो — मग ती व्यक्ति खुद्द चरित्र—विषय झालेली असो अथवा अन्य कोणी असो — त्या त्या वेळीं लेखकाला आपली लेखणी कित्येकदां आवरून धरावी लागते अथवा मूळ मुद्याला सरळ न धरतां त्याचेभोंवतीं रिंगण घालून तो सूचित करण्याचा आडवळसा घ्यावा लागतो. तथापि चरित्रलेखनांतील हा एक सर्वमान्य ...द्धांत आहे असें म्हणावयास हरकत नाहीं, कीं गुणांचें वर्णन यथाप्रमाण करावें ...े दोषांचें प्रमाण अपरिहार्य होईल तेव्हांच व अवश्य असेल तितकेंच करावें. ...दा पुष्कळ प्रसंगीं उल्लंघिली जाते व 'यथातथ्य दर्शनाच्या' नांवाखालीं ...चें समर्थनहि करण्यांत येतें. परंतु यापुढें आम्ही जे चार विचार प्रकट करणार आहों ...का विशिष्ट मंगल प्रसंगास अनुलक्षून असल्यामुळें आम्ही वरील मर्यादा ...पणें पाळण्याचें ठरविलें आहे. प्रस्तुत लेख हा श्री. चिंतामण विनायक वैद्य ...ा चरित्रवजा नसून त्यांच्या चरित्राचें सारभूत असें दिग्दर्शन आहे. त्यांच्या ...ा सत्तरी भरली या निमित्तानें कल्याण येथील रहिवाशांनीं त्यांच्याविषयींची ...चिंते आदरबुद्धि व प्रेम व्यक्त करण्याकरितां रविवार ता. २५-१-३१ रोजीं संस्थ...मारंभ करण्याचें योजिलें आहे. या सामुदायिक समारंभाच्या पर्वणीचे ...पणहि आपली पूज्यभावना व्यक्त करावी इतकाच या लिहिण्याचा

## दुर्मिळ म्हातारा.

'चहा पीत पीत अनेक वर्षे जगणारे म्हातारे पुष्कळ असतात. परंतु कांही तरी राष्ट्रोन्नतीचें कार्य करीत जगणारे म्हातारे दुर्मिळ असतात.' केसरी-मराठा संस्थेच्या ५१ व्या वाढदिवसाच्या प्रसंगीं जाहीर सभेंत एका स्वतः वयोवृद्ध अशा ज्ञानवृद्धानें हे उद्गार काढले होते. साधारणपणें थंडीच्या दिवसांत सकाळीं ८ चा सुमार म्हणजे पुण्यांत तरी बहुतेकांची चहाची वेळ असावयाची. अशा वेळीं 'भारत-इतिहास' संशोधकमंडळाच्या मुख्य इमारतीच्या उजव्या बाजूस असलेल्या बैठ्या चाळींतील एका खोलीच्या दाराशीं, लहानशा ऊबदार बैठकीवर शाल पांघरून खुरमांडी घालून तिजवर कागद ठेवून लिहित असलेले एक वृद्ध गृहस्थ; शेजारीं ५।२५ ग्रंथ ओळीनें मांडून ठेवले आहेत आणि आसपास कोठें चहापानाची सिद्धता नाहीं, असें चित्र पाहून वरील दुर्मिळ म्हाताऱ्यांपैकींच ही एक विभूति आहे असें कोण म्हणणार नाहीं? आम्ही दाराशीं जातांच पादत्राणांतून पाय काढी-तच अभिवादनपूर्वक विचारलें ' काय, वेळ आहे का ? ' त्या लेखनमग्न गृहस्थानें वर पाहून उल्लसित वृत्तीनें ' हो हो, हवा तेवढा ' असें दिलेलें उत्तर आणि पाठोपाठ एक निरागस हास्यगर्जना कीं जी ऐकणारानेंहि उल्हासित व्हावें ! आम्ही खोलींत शिरत असतांच शालजोडीनें झांकलेलें मांड्या खुरडून तयार केलेलें तें स्वावलंबी टेबल खालीं झालें, कागद व लेखनसाहित्य दूर सारलें गेलें आणि पुन्हां एकदां पूर्वीचेंच हास्य आणि ' या बसा ' असे स्वागतपर शब्द एकदमच ऐकूं आले. ' म्हातारे ' झालेल्यांचे प्रकार वर्णन करणारे वरील उद्गार ज्यांनीं काढले ते श्री. चिंतामण विनायक उर्फ नानासाहेब वैद्यच यावेळीं आमच्याकडे हंसतमुखपणें पहात होते.

## ग्वालेरीस जाईपर्यंत.

वैद्यांचें घराणें मूळ कोंकणांतून दाभोळ येथून वर सरकत पेण तालुक्यांत 'वरसई' येथें सुमारें दोनशें वर्षांपूर्वी स्थाईक झालें. तेथें त्यांना इनामही आहे. या घराण्यांतील एक तडफदार गृहस्थ विनायकराव हे तेथून कल्याण येथें येऊन वकीलीचा धंदा करूं लागले. त्या धंद्यांत त्यांची चांगली चलती होती व ग तही त्यांचा दरारा असे. लवकरच कल्याणास घरें वगैरे स्थावर मिळकत विकत घेतली आणि वैद्यांचें घराणें कल्याणास स्थाईक झालें. वरसई

उत्पन्न देवास लावून दिलें आणि अशा प्रकारें वरसईकर वैद्य हे कल्याणकर वद्ये होऊन वरसईशीं त्यांचा संबंध केवळ 'राहणार वरसई हल्लीं वस्ती कल्याण' इतकें सांगण्यापुरताच राहिला. वैद्यांचे कुलोपाध्याय गोडशे हे वरसईसच राहिल्यानें ते जाते येते असत, यामुळें तो दुवा मात्र राहिला होता. विनायकराव वैद्य यांच्या दुसऱ्या मुलाचा जन्म अश्विन शु. १५ शके १७८३ (ता. १८ आक्टोबर १८६१) रोजीं झाला व त्याचें नांव चिंतामणी असें ठेवण्यांत आलें. यथाकाल चिंतामणीचा व्रतबंधहि झाला व शाळेंतील शिक्षणहि सुरू झालें. साठ वर्षांपूर्वी लहान मुलांच्यावर हल्लींप्रमाणें शिक्षणाची विशेष सक्ती होत नसे आणि मोडी बाळबोध लेखन–वाचन व गणित याहून अधिक विषयांचा प्राथमिक शिक्षणक्रमांत प्राधान्येंकरून अंतर्भावहि होत नव्हता. सरासरी लिहितां वाचतां येऊन जुजबी हिशेब ठिशेब ठेवतां आले म्हणजे बहुतेक मुलांच्या शिक्षणाची सीमा संपे. चिंतामणि त्यापुढें जाऊन इंग्रजी शिकूं लागला व मॅट्रिकच्या परीक्षेसहि बसला ही गोष्ट जशी त्याच्या हुशारीची त्याचप्रमाणें त्याचे वडील विनायकराव यांच्याहि नवीन विचार आत्मसात करण्यास लागणाऱ्या उदार मनोरचनेची द्योतक आहे. मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिला नंबर जो एकदां पटकाविला तो एम. ए. परीक्षेपर्यंत चिंतामणरावांनीं सोडला नाहीं. बुद्धि साऱ्या विषयांत सारखीच तीव्रतेनें चालावयाची. पुष्कळांची कल्पना आहे कीं चिंतामणराव हे संस्कृत विषयाचे एम. ए. आहेत म्हणून. परंतु त्यांनीं एम. ए. ला गणित घेतलें होतें. पुढें एलएल. बी. ची परीक्षाहि झाली आणि १८८७ च्या सुमारास ग्वालेर संस्थानांत त्यांना नोकरी मिळाली व ती त्यांनीं धरली. त्यांचे वडील यापूर्वींच दिवंगत झाले होते. आणि स्वतंत्रपणें वकीलीचा नाद कदाचित् त्यांना सांपत्तिक कारणांमुळें सोडावा लागला असेल. वडिलांचें वकीलीचें गांव त्यांच्या बुद्धिमत्तेस व महत्वाकांक्षेस अपुरें आणि मुंबई मार्गे कोणाचा पाठिंबा नसतां अनावर म्हणून - शिवाय एकदम दरमहा पांचशें रुपयांची व पुढें अधिकाधिक वाढ होण्याजोगी नोकरी अनायासेंच मिळाली म्हणून, पण अशा रीतीनें लौकिक दृष्टया विद्याभ्यास पुरा करून श्री. चिंतामणराव हे ग्वालेरींत उज्जैन येथें नोकरीवर रुजू झाले. या वेळीं ग्वालेर संस्थानाधिपति अज्ञान असल्यामुळें रीजन्सीमार्फत राज्यकारभार चालू होता.

महाराज वयांत आल्यानंतर त्यांचा व श्री. वैद्य यांचा निकटसंबंध आला आणि परस्परांचे संबंध नेहमींच सलोख्याचे राहिले.

## अष्टादशवार्षिक उद्योगपर्व.

संस्थानी नोकरी, पैसा व स्वास्थ्य दोन्हीहि मिळूं लागलीं. कॉलेजांत असतांच व्यायामानें शरीर आणि अभ्यासानें मन व बुद्धि यांचा जोरकस विकास झाला होता. त्यांनीं स्वतःच मागें एकदां व्याख्यानांत सांगितलें कीं ' व्यायाम व अभ्यास हीं नियमानें प्रत्यहीं झालींच पाहिजेत असा माझा कटाक्ष असे. आणि अभ्यासाचे तास वाढले कीं इकडे व्यायामाचें प्रमाण देखील वाढावयाचें आणि साहजिकच खाण्याचेंहि प्रमाण वाढे हें सांगावयास नकोच.' सत्तर वर्षें झालीं असूनहि प्रकृति निरोगी आहे व चाळिशी एकदाहि लागली नाहीं याचें श्रेय विद्यार्थीदशेंत रचलेल्या व्यायामाच्या भरभक्कम पायासच आहे. असो. ग्वालेरीच्या सुखकर वातावरणांत ऐन उमेदींत असलेल्या वैद्यांच्या स्थितींतील कोणासही अनेक व्यसनें जडणें संभवनीय होतें. तशीं श्री. वैद्यांनाहि कांहीं जडलीं आणि तीं उत्तरोत्तर वाढतच गेलीं. व्यसनें अनेक आहेत परंतु खरीं दोनच. तीं विद्याभ्यसन व हरिपादसेवन हीं होत. कारण बाकीचीं अनिष्टपरिणामकारक असून सुटूं शकतात. परंतु हीं दोन इष्टपरिणामकारक असून एकदां जडलीं कीं बहुधां कायमचींच. हीं दोन्हीहि न्यायाधीश वैद्यांस जडलीं आणि त्यांचें यापुढील सर्व आयुष्य हा त्यांचाच परिपाक आहे. उज्जैन येथें असतां एका नारायणशास्त्री जोशी नांवाच्या ग्रहलाघवी ज्योतिषाशीं नानासाहेबांची गांठ पडली. एम. ए. ला गणित विषयांत खगोलशास्त्र अभ्यासिलें होतेंच. आतां ज्योतिषाचा नाद लागला; ग्वाल्हेरीस रामशास्त्री हर्डीकर नांवाचे एक वेदांती होते, त्यांच्याशीं वेदांताचा करून अभ्यास केला व समग्र ' शारीर—भाष्य ' वाचलें. कॉलेजांत ' हिंदुस्थान संगीतपद्धति ' कर्ते पं. वि. ना. भातखंडे सहाध्यायी होते त्यांच्या सहवासांत संगीत कलेची आवड उत्पन्न झाली होतीच. त्या वेळीं ग्वालेर म्हणजे गायन—वादन कलेचें माहेरघर असून तेथें त्या कलेंत निष्णात अशीं वडींवडीं घेंडें असत. त्यांना राजाश्रयहि चांगला असे. अमीरखां नांवाचे अप्रतिम सतारिया तेथें होते त्यांजपासून तीहि कला नानासाहेबांना अवगत करून घतली. हे सर्व चालू असतांच महाभारत व रामायण या

महाकाव्यांचें अभ्यसन चिकित्सापूर्वक चालूं होतें. असें हें उद्योगपर्व सतत १८ वर्षें चालूं होतें. नानासाहेबांची ग्वालेरची सांपत्तिक कमाई संपुष्टांत आली असेल, हुद्याची रावबहादुरी सोडून द्यावी लागली असेल परंतु या उद्योगामुळें कमावलेली 'भारताचार्य' ही पदवी मात्र त्यांचेपासून कधींहि हिरावून घेतली जाणें अशक्य आहे. भारताचीं पर्वें १८, भारतीय युद्धाचे दिवस १८, वैद्यांनीं भारताचें आलोडन केलेली वर्षसंख्याहि १८ च, हा योगायोग नव्हे काय ?

## 'बंडाची हकीकत.'

कालेजांत विद्यार्थी असतांपासूनच स्वदेशाच्या इतिहासाकडे त्यांचें लक्ष वेधलें. त्यांचे कुलगुरु वे. मू. विष्णूभटजी गोडशे चातुर्मासांत कल्याणास यावयाचे. यांनीं १८५७ च्या बंडाच्या धामधुमींत उत्तर हिंदुस्थानांतील यात्रा केल्या होत्या. त्या गमती ते मुलांना सांगावयाचे चतुर चिंतामणरावांनीं ओळखलें कीं या गृहस्थाची ही हकीकत एकत्र छापून काढली तर फार मनोरंजक होईल व कायम टिकेल. त्यांनी सांगितलें 'विष्णुभटजी, ही जी तुम्ही विस्कळित हकीकत सांगतां त्यापेक्षां सुसंबद्ध रीतीनें तुमच्या प्रवासाची बखर ध्यानात लिहून ? पहा, लिहाल तर मी तुम्हांला त्याचे शंभर रुपये देईन.' भटजीहि चलाख होते. जुन्या बखरी लिहिण्याची पद्धति त्या वेळीं मोडी अक्षर घटविणारांना ज्ञात असेच. त्यांतच विष्णुभटजींना ही हकीकत लिहिण्यांत आत्मगौरव, अर्थप्राप्ती आणि यजमानांच्या विद्वान् व आस्थेवाईक मुलाचा लळा पुरविण्याची संधी इतक्या गोष्टी साधत होत्या. भटजींनीं लवकरच सुवाच्य मोडी अक्षरांत लिहिलेल्या व खोडाखोड नसलेल्या अशा दोन वह्या नानांच्या अंगावर फेंकल्या. परंतु त्यांतील कांहीं मजकूर गाळणें अवश्य झालें आणि एका सुप्रसिद्ध कायदेपंडिताचें मत पडलें कीं भटजींच्या हयातींत पुस्तक प्रसिद्ध करूं नये. त्याप्रमाणें भटजींच्या पश्चात् तें पुस्तक चिंतामणरावांनीं प्रसिद्ध केलें व ठरल्याप्रमाणें शंभर रुपये त्यांच्या वारसांना दिले. हल्लीं या पुस्तकाची तिसरी आवृत्ति निघाली आहे. मूळ वह्या भारत इतिहास संशोधक मंडळांत ठेविल्या आहेत. असो. सांगण्याचा मुद्दा असा कीं विद्यार्थीदशेंत ज्या ज्या बाबींचा अंकुर फुटला होता तो पुढील काळांत फोंफावतच जाऊन

श्री. नानासाहेब यांनीं १९०५ मध्यें ग्वालेर सोडली त्यावेळीं ते एक प्राच्यविद्या-विशारद, इतिहास-संशोधक, अष्टपैलू विद्वान गृहस्थ याप्रमाणें ओळखले जात होते.

## अबलोन्नति-लेखमाला.

ग्वालेरीस असतांना धर्मशास्त्राचें परिशीलन करीत असतां समाज सुधारणेच्या विशेषतः स्त्रियांच्या स्थितीबद्दलच्या कांहीं गोष्टी ठळकपणें त्यांच्या नजरेस आल्या. त्यांपैकीं कित्येक रूढ कल्पनांना धक्का देणाऱ्या अशा होत्या. आपले सिद्धांत जनतेसमोर मांडणें हें त्यांना जरूर वाटलें. पुणें येथें नवीनच केसरी पत्र सुरू झालें होतें. पंडित महापंडितांनीं निर्मिलेलें आणि संगोपिलेलें हें चुणचुणीत वर्तमानपत्र त्या वेळीं लोकादरास पात्र झालें होतें. त्याचा खप चार हजार म्हणजे त्या वेळच्या मानानें फार होता. प्रस्तुत कालीं त्याचें चालकत्वहि पुढें लोकमान्य झालेल्या परंतु त्यावेळीं एक नवीन प्रकारच्या तडफेचा विद्वान गृहस्थ म्हणून ओळखले जाणारे श्री. बाळ गंगाधर टिळक यांच्याकडे होतें. श्री. वैद्यांना आपले लेख केसरीबरोबर प्रसिद्ध व्हावे असें साहजिकच वाटलें. त्याप्रमाणें त्यांच्या 'अबलोन्नति मालें' तील पहिले चार लेखांक पुरवणी म्हणून केसरीबरोबर प्रसिद्ध करण्यांत आले. यांमध्यें स्त्रियांचें सामाजिक स्थान व कर्तव्यें, प्रौढ-विवाह वगैरे विषयांचें उदार दृष्टीनें पूर्वींचे दाखले व आधार दाखवून विवेचन केलें होतें. यापुढील तीन लेखांक स्वतंत्र रीतीनें प्रसिद्ध करण्यांत आले आणि त्यांत 'अक्षत-योनि विधवाविवाहाची सशास्त्रता,' 'स्त्रीशिक्षण' इत्यादि महत्वाचे विषय विवेचिले आहेत. अबलोन्नति-लेखमाला त्या काळीं फारच गाजली. तींतून प्रकट केलेले विचार तत्कालीन समाजाला क्रांतिकारक वाटल्यास व त्याबद्दल अनुकूल प्रतिकूल टीकांचा भडिमार झाला असल्यास नवल नाहीं.

## ग्वालेर सोडली.

अशा प्रकारचे विविध उद्योग फावल्या वेळांत करीत करीत, प्रथम १० वर्षें न्यायाधीश व नंतर सरन्यायाधीश या नात्यानें मिळून एकंदर १८ वर्षें ग्वालेर संस्थानची नोकरी झाली. आणि आतां आपण स्वतंत्र होऊन वाङ्मय-व्यवसाय करावा व पर्यायानें व प्रत्यक्ष जी काय समाजसेवा व राष्ट्रसेवा करतां येईल ती यथाशक्ति करावी या उद्देशानें प्रेरित होऊन नानासाहेबांनीं नोकरी सोडण्याचा

निश्चय केला व तो १९०५ सालीं अमलांतहि आणला. वास्तविक त्यांनीं स्वतःच दरबारला सेवानिवृत्तांची सोय करण्याबाबत जी योजना करून दिली होती तिजप्रमाणें पाहतां त्यांना पेनशन अगर इतर रीतीचा कांहीं एक हक्क सांगतां येत नव्हता. आणखी दोन वर्षें नोकरी केली असती तर थोडेंबहुत पेनशन बसलें असतें. या वेळीं ते मुख्य न्यायाधीश असून वेतनहि हजार रुपये दरमहा मिळत होतें. परंतु त्यांनीं सेवानिवृत्त होण्याचा निश्चय केला तो केलाच. कै. माधवराव महाराज यांनीं मात्र वैद्यांच्या बद्दलची आपली निष्ठा व प्रेमबुद्धी त्यांना सुमारें १२।१३ हजार रुपयांची ग्रॅच्युइटी देऊन व्यक्त केली. वस्तुतः वैद्यांना पैसाच मिळवावयाचा असता तर अन्य संस्थानांतून नोकरी मिळाली असती अथवा मुंबई हायकोर्टांत वकीली केली असती तरी हजारों रुपये मिळवितां आले असते. त्यांना तसा आग्रहहि झाला परंतु त्यांनीं पुन्हा नोकरी कोठेंच न करण्याचा आपला निश्चय अचल ठेविला. अद्यापहि ग्वालेर दरबारचा त्यांना फार अभिमान वाटतो आणि त्या दरबारचा विनावेतन सेवक म्हणवून घेण्यांत त्यांना भूषण वाटतें. ग्वालेरनेंहि हा प्रेममूलक ऋणानुबंध राखला असल्याचें तेथील साहित्यसंमेलनास त्यांची मुद्दाम स्वागताध्यक्ष म्हणून नेमणूक करून व्यक्त केलें.

## ह. भ. प. नानाबुवा कल्याणकर.

नानासाहेबांच्या आयुष्याचे स्थूलतः तीन भाग पडतात. पहिला ग्वालेरीस जाणेंपूर्वींचा. या कालांत असामान्य बुद्धीचा यशस्वी विद्यार्थी ही कीर्ति त्यांनीं संपादन केली. दुसरा खुद्द ग्वालेरीच्या वास्तव्याचा. या कालास महापंडित व्हावयाच्या पूर्वींच्या तपश्चर्येचा काल असें म्हणूं. तिसरा तेथून सेवानिवृत्त झाल्यानंतर आजतागायतचा. दुसरा विभाग १९०५ सालीं संपला. येथेंच ग्वालेर येथें घडलेल्या एका कौतुकावह प्रसंगाचा उल्लेख करून आपण तिसऱ्या विभागाकडे वळूं. तरुण महाराजांनीं गजाननोत्सव नवीनच सुरू केला होता. दक्षिणेंतील कीर्तनकार तेथें जाऊन दर कीर्तनास पांचशें रुपये बिदागीदाखल मिळवीत. दरबारच्या आश्रितांतहि कांहीं हरिदास होते. एकदां महाराज नानासाहेबांना सहज विनोदानें म्हणाले 'क्यंव आप कीर्तन करोंगे ?' नानासाहेबांनीं उत्तर दिलें 'हां हुजूर, आपकी आज्ञा होगी तो करेंगे.' महाराजांनीं ताबडतोब 'कलहि करना' असें उत्तर

दिलें व नानासाहेबांनीं कबूलहि केलें. दुसऱ्या दिवशींच्या कीर्तनाचा थाट काय विचारावा ! न्यायासनावर बसणारा कायदेपंडित हरिदास बनून पूर्वरंग उत्तररंगासहित कीर्तन करणार ! तेथें श्रोत्यांना काय तोटा ? दरबारी कीर्तनकारांच्या फडांतील वीस मंडळींचा ताफा मागें ध्रुपद धरण्यास तयार अशा थाटांत ह. भ. प. नानाबुवा कल्याणकर एम. ए. एल एल. बी. हे कीर्तनास उभे राहिले. वे. रामचंद्र शास्त्री हर्डीकर यांजपाशीं अभ्यासिलेला वेदांत आधुनिक चिकित्सा· पद्धतींतून तावून सुलाखून बाहेर पडूं लागला व महाराजांसह सर्व श्रोते तटस्थ झाले. आख्यान ' भरत–भेटीचें ' लाविलें होतें. ' हेंचि दान देगा देवा ' झालें. आरतींत शिरस्त्याप्रमाणें ५०० रुपये महाराजांनीं टाकले. बोवाहि बिदागी उपरण्यांत बांधून घराकडे निघाले. ' महिनाभर न्यायदानाचें किचकट काम करून एकदां हजार रुपये मिळावयाचे, परंतु एका रात्रींत पांचशें रुपये मिळणारा हरिदासी संप्रदायच बरा, तोच पेशा पतकरावा' असा विचारहि कदाचित ते करीत असावेत. इतक्यांत ती बिदागी मागील वीस मंडळींत प्रत्येकीं २० रु. प्रमाणें वाटावी असें सुचविण्यांत आलें. त्याप्रमाणें रकमेची वांटणी झाली आणि उरलेले शंभर रुपये त्यांचे वेदांताचे गुरु रामचंद्रशास्त्री हर्डीकर यांना पोंचविण्यांत आले. याच गोष्टीस अनुलक्षून कीर्तनसंमेलनाचे अध्यक्ष नेमिलें असतां ' अहो, मीहि कीर्तनकारच आहें ' असें श्री. वैद्य म्हणाले होते.

## २५ वर्षांपूर्वीचें पुणें.

१९०५ सालचें पुणें. त्यावेळीं टिळकांचा एक व गोखल्यांचा एक असे परस्परविरोधी दोन पक्ष प्रबल होते. खरोखरी दोघांच्याहि ध्येयांत अथवा साधनांत तीव्र फरक होता असें नाहीं. फरक होता तो विचारसरणींत आणि मनोभूमिकेंत. राजकारणांत काय अथवा समाजकारणांत काय, क्रांतिकारक मार्गाचा अवलंब करण्यास कोणीच तयार नव्हता. राजकारणांत सत्ताधारी सरकारला होतां-होईतों दुखवावयाचें नाहीं अशी गोखले पक्षाची विचारसरणी होती तर समाज–कारणांत जीर्णमतवाद्यांना दुखवूं नये असें टिळकपक्षाचें धोरण. उलट योग्य त्या मार्गानें चालत असतां सत्ताधारी सरकारचा रोषहि पुरवला इतकी कणखर वृत्ती दाखवावी असें म्हणणारा टिळकपक्ष तसा काटकपणा नसलेल्या गोखलेपक्षाला 'मवाळ' ठरवी व समाजाला त्यांनीं दुखविल्याबद्दल ' घरच्या म्हातारीचा

काळ ' म्हणून हिणवी. गोखलेपक्षानेंहि आपल्या प्रतिस्पर्ध्यांना त्यांच्या लोकछंदानुवर्ती सामाजिक धोरणाबद्दल ' सवंग लोकप्रियतेच्या मार्गे लागलेले ' असा उलट अहेर करावा. हल्लींप्रमाणें त्या वेळचें राजकारण बहुजनसंख्येच्या अनुयायित्वावर मोजलें न जातां प्रतिष्ठित, विद्वान व विचारवंत समजल्या जाणाऱ्या लोकांच्या संख्येवर गणलें जाई. सारांश तो काळ बौद्धिक मिरासदारांचा ' (Intellectual Aristocracy) होता अर्थातच अशा गृहस्थांना आपापल्या पक्षांत ओढण्याचे. पराकाष्ठेचे प्रयत्न उभय पक्षांकडून होत.

## गोखले कीं टिळक.

नानासाहेबांसारखा मनुष्य पुण्यांत येतांच गोखले व टिळक दोघांच्याहि पक्षांनीं त्यांना घेरल्यास नवल नाहीं. त्यांनाहि कोठल्या ना कोठल्या पक्षांत प्रविष्ट व्हावयाचें होतेंच. कोणत्या दारानें शिरावें हा एक बिकट प्रश्नच त्यांच्या पुढें पडला असेल. स्वतांचीं अशीं राजकीय मतें निश्चित न झालेलीं. गोखले पहिल्या प्रतीचे राष्ट्रसेवक, व्यवहारी मुत्सद्दी आणि कसलेले धुरीण खरे परंतु त्यांच्यांत तत्वज्ञान्याचा, पंडितगिरीचा, बुद्धिवैभवाचा प्रकर्ष नव्हता. नानासाहेबांच्या मनाला टिळकांच्या सर्वंकष लोकोत्तर बुद्धिवैभवाचा ओढा लागावा हें साहजिक होय. शिवाय गोखले त्यांच्या मागील पिढींतले; एलफिन्स्टन कॉलेजांत फेलो असतां त्यांना शिकविलेलें देखील. टिळक एक पिढी आधींचे आणि सर्वच बाबतींत वडीलकीस पात्र. हेंहि एक कारण नानासाहेब टिळकांच्या पक्षांत जाण्यास उपयुक्त झालें असें असूं शकेल. अबलोन्नति-मालेच्या निमित्तानें त्यांचा त्यांचा पूर्वी संबंधहि आला होताच. अशा रीतीनें नानासाहेबांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमास सुरुवात झाली. राजकारणांत नानासाहेबांनीं टिळकांचा पक्ष या वेळीं जो धरला तो टिळकांच्या मृत्यूपर्यंत. त्यानंतर ते महात्मा गांधींच्या पक्षास मिळाले व हल्लीं जरी ते राजकारण–निवृत्त असले तरी त्यांची महात्मा गांधींच्या राजकारणावरील श्रद्धा शिथिल झालेली नाहीं. १९०८ च्या चळवळींत नानासाहेबांनीं 'राष्ट्रीय शिक्षणा' च्या बाबतींत लोकमान्यांच्या बरोबरीनें बरेंच कार्य केलें; होमरूलच्या चळवळीस व्याख्यानें वगैरेंच्या रूपानें हातभार लावला; लोकमान्यांच्या डेमोक्रॅटिक पक्षांत ते प्रामुख्यानें शिरले; आणि लोकमान्यांच्या प्रत्येक

हालचालींत त्यांनीं सक्रिय सहाय्य दिलें. महात्माजींच्या असहकारितेच्या चळवळींत ते अधिक जोमानें पडले. परंतु ' राष्ट्रीय शिक्षण ' हेंच क्षेत्र त्यांनीं आंखून घेतलें. पुण्याच्या टिळक–महाविद्यापीठाचे ते आरंभापासून कुलगुरु असून टिळक–महाविद्यालयांत प्रारंभीचीं दोन तीन वर्षें ते संस्कृत विषयाचें अध्यापनहि करीत व या संस्थांसाठीं वार्धक्य असूनहि द्रव्यसहाय्य मिळविण्यासाठीं त्यांनीं दौरे काढले. त्यांच्या राजकीय कार्याचें याहून अधिक विवरण करण्याचें हें स्थल नव्हे.

## तत्त्वज्ञ व्यवहारी बनला.

एक मात्र झालेलें दिसतें कीं समाज सुधारणेच्या बाबतींत त्यांजकडून फारसें काम यापुढें झालें नाहीं. याचीं कारणें अनेक असूं शकतील. परंतु १९ व्या शतकाचे शेवटीं विधवाविवाहाचा कांहीं मर्यादेपर्यंत पुरस्कार करणारा हा तत्त्वज्ञ समाजसुधारक प्रत्यक्ष समाजांत कर्मभूमीवर उतरल्यावर व्यवहारी बनला असें आम्हांस वाटतें. 'दुर्दैवी रंगु' ही एकच कादंबरी अशी त्यांनीं लिहिली. परंतु ती फारच हृदयंगम आहे. 'अक्षतयोनि बालविधवे'चा प्रश्न या कादंबरींत इतका यथार्थतेनें उठविला आहे कीं रंगूचें मुग्ध पात्र चटका लावून रहातें. परंतु कथानक पेशवाईतील असल्यामुळें या प्रश्नाचा निर्णय देण्याचें सहजच टळलें आहे. जर तें कथानक एक शतक पुढें ढकलतां आलें असतें तर आम्हांस तरी अशी खात्री वाटते कीं ग्रंथकारानें रंगूचा विवाह लावूनच कादंबरी संपविली असती. ' कलावाद्यंतयो स्थितिः ' या वाक्यानुसार कलियुगांत क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्वच नाहीं असें प्रतिपादण्यांत येऊं लागलें होतें व अद्यापिहि येत असतें. यामुळेंच महाराष्ट्रांत तरी कोल्हापूर प्रकरण उद्भवून सत्यशोधक चळवळ जोरावली व महाराष्ट्र तडकला. नानासाहेब वैद्यांनीं क्षत्रियवैश्यांचें अस्तित्व आणि वरील वाक्याचें प्रक्षिप्तत्व आपल्या 'मध्ययुगीन भारत' या ग्रंथांत प्रस्थापित केलें आहे. वरील वाक्य कोठल्या पुराणांत आहे हें नक्की कोणीच सांगत नाहीं. कमलाकरानें नुसतें 'पुराणांतरेपु' असा हवाल्यावर टवाला दिलेला आहे इतकेंच नव्हे तर १३ व्या शतकानंतर हें वाक्य कोणी वाई क्षेत्रस्थ पंडितानें रचिलें असावें असेंहि अनुमान त्यांनीं काढलें आहे. पंढरपूर येथें भरलेल्या कोमटी वैश्य परिषदेचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें तें त्यांच्या वरील निर्भीड मतप्रदर्शनामुळेंच होय. लोकमान्यांनीं पंचांग-

संशोधनाचें कार्य चालू केलें त्यांत सुरुवातीस नानासाहेब त्यांच्याच मताचे होते. परंतु सांगली संमेलनानंतर टिळकांचा रेवतीपक्ष आणि त्यांचा चित्रापक्ष असा जो बेबनाव झाला तो आतां मिटण्याचीं चिन्हें नाहींत. गीता सर्व प्रकारचे योग सांगते परंतु उद्दिष्ट निरूपण कर्मयोगाचेंच आहे हा लोकमान्यांचा सिद्धांत त्यांना मान्य आहे. कांहीं श्लोकांचा अर्थ ते निराळया रीतीनें लावीत असल्यामुळें त्यांनींहि आपली निराळी सार्थ गीता प्रकाशित केली आहे. अशा रीतीनें १९०५ पासून त्यांनीं आपल्या सार्वजनिक आयुःक्रमास सुरुवात केली असतां एकीकडे वाङ्मयात्मक कार्य चालू ठेविलें होतें. त्यांच्या सार्वजनिक कामगिरीविषयीं अधिक परीक्षण करण्यास या त्रुटित लेखांत स्थलावकाशहि नाहीं आणि लेखकासहि आपण तसें करण्यास अधिकारी आहों असें वाटत नाहीं.

## उत्तरहिंदुस्थानांतील मुलुखगिरी.

नानासाहेबांच्या वाङ्मयिक कामगिरीसंबंधानें असें म्हणतां येईल कीं त्यांनीं हातांत धरला नाहीं असा कोणताहि विभाग उरला नाहीं आणि जो जो त्यांनीं हातीं धरला त्या प्रत्येकांत उच्च स्थान मिळविलें. महाभारताच्या दीर्घकालीन अभ्यासानंतर त्यांनीं त्याची एक संक्षिप्त आवृत्ति तयार केली. चिपळुणकर मंडळीच्या भारताच्या भाषांतराचे भाग पुरे झाल्यावर 'महाभारताचा उपसंहार' हा मेरुमणि ग्रंथ त्यांनीं लिहून पौराणिक वाङ्मयाच्या चिकित्सापद्धतींचा पाया घालून दिला. हा ग्रंथ इतका सुबोध आणि रसाळ झाला आहे कीं सामान्य वाचकासहि त्याच्या वाचनानें ज्ञानानंदाची उभयविध जोड होते. भारतीय युद्धकालनिर्णयादि त्यांचे अनेक सिद्धांत कित्येक तज्ज्ञांस सर्वांशीं मान्य नसले तरी ती बाब शेंकडा नव्याण्णव वाचकांच्या आटोक्याबाहेरची समजली पाहिजे. 'रिडल आफ रामायण', 'मिडीव्हल इंडिया' ('मध्ययुगीन भारत' हा मराठी तर्जुमा), 'मानवधर्मसार', 'संकृत वाङ्मयाचा इतिहास' इत्यादि ग्रंथांवरून त्यांच्या प्राचीन आर्य वाङ्मयाच्या विशाल अभ्यासाची कल्पना येते. 'कृष्णचरित्र' 'रामचरित्र' या चरित्रग्रंथांचा लाभ तर आबालवृद्धांस घेतां येतो. स्फुट विषयांवर संकीर्ण लेख व लेखमाला तर त्यांनीं इतक्या लिहिल्या आहेत कीं, त्यांची नुसती मोजदाद करणें सुद्धां प्रस्तुत लेखांत टाळलेंच पाहिजे. 'दुर्दैवी रंगू' लिहून

कादंबरी विभागांत त्यांनीं उत्कृष्ट भर घातली आहे. त्याचप्रमाणें यांचें एक नाटकहि तयार आहे असें ऐकतों. त्यांनीं कविता केल्याचें ऐकिवांत नाहीं परंतु सदरहु नाटक संगीत स्वरूपांत रंगभूमीवर येण्याचा योग येईल तर रागतालबद्ध कविताहि ते लिहूं शकतील असा भरंवसा वाटतो. सारांश, प्राच्यविद्या विशारद, इतिहास-संशोधक, भाषाशास्त्रकोविद, चरित्रलेखक, कादंबरीकार, नाटककार, निबंध-लेखक इत्यादि निरनिराळ्या स्वरूपांनीं त्यांनीं मराठी भाषेंतील ग्रंथसंग्रहांत इतकी भर घातली आहे आणि ती संख्येप्रमाणेंच गुणांनींहि इतकी उच्च दर्जाची आहे कीं तसलें भाग्य फारच थोड्यांच्या नशीबीं असतें. महाराष्ट्राबाहेर मुलुखगिरीवर गेलेला कांहीं शतकांपूर्वीचा सेनानी ज्याप्रमाणें येतांना आपल्याबरोबर हिरे, माणकें, मोतीं, इ. अमूल्य लूट आणीत असे व त्यांच्या दर्शनानें आपल्या मातेला व आप्तेष्टांस आनंद देत असे तोच प्रकार उत्तरहिंदुस्थानांतून १८ वर्षांनी महाराष्ट्रांत परत आलेल्या नानासाहेबांनीं केला आणि आपल्या मातृभाषेस सजविलें रिझविलें, असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. फरक इतकाच कीं यामुळें उत्तर हिंदुस्थान कंगाल बनला नाहीं !

## वाङ्मयतपस्या.

नानासाहेबांनीं साहित्यसंमेलनांतून प्रामुख्यानें भाग घेण्यास सुरवात १९०७ सालच्या १८ व १९ मे ला पुण्यास मळेकरांच्या वाड्यांत भरलेल्या अधिवेशनापासून केल्याचें दिसतें. त्या सालीं त्यांनीं ' मराठी वाङ्मयाची भावी उन्नतावस्था ' हा निबंध वाचला. पुढील सालींच पुण्यासच विजयानंद नाटकगृहांत भरलेल्या साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें. अध्यक्षीय भाषणांत गतवर्षांत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचा सटीक आढावा घेण्याचा पायंडा प्रथमच त्यांनीं पाडला आणि संमेलनानंतर झालेल्या टीकांवरून असें दिसतें कीं हा उपक्रम त्या वेळीं कित्येकांस पसंत पडला नाहीं. परंतु तेव्हांपासून ही जी प्रथा पडली ती पडलीच व आजतागायत चालू आहे. ग्वालेर येथें १९२८ सालीं श्री. माधव श्रीहरि अणे यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या तेराव्या संमेलनास नानासाहेबांना ग्वालेरकरांनीं स्वागताध्यक्ष नेमल्याचें वर येऊन गेलेंच आहे. श्री. नानासाहेब चापेकर यांच्या नेतृत्वाखालीं नेमलेल्या शुद्धलेखन कमिटीचेहि एक सभासद होते. त्यांच्या या चौफेर वाङ्मयिक विहाराबद्दल नुकताच बडोदा संस्थानाधिपतींनीं त्यांचा जो सन्मान केला तो योग्यच होता यांत संशय नाहीं. नानासाहेबांची लेखनपद्धति

प्रासादिक, सौजन्यपूर्ण आणि प्रांजल असली तरी नटवी नाहीं. बाह्यसौंदर्यापेक्षां सद्गुणांनींच वाचकांचें चित्ताकर्षण करण्याकडे भर अधिक. त्यांचें लिहिणें अचूक नसतें, पाल्हाळिक असतें असा कित्येकांचा आक्षेप आहे. परंतु ऐन वादाच्या दंगलींत प्रतिपक्षानें शिष्टाचार गुंडाळून ठेवला असतांहि हा वाङ्मयतपस्वी बेफामपणें उद्वेगकर वाक्प्रहार फेंकून आपली लेखणी विटाळीत नाहीं याचा अनुभव, कै. डॉ. गुणे यांचा व त्यांचा जो चुरशीचा सामना चित्रमयजगत् व विविधज्ञानविस्तार यांमधून कांहीं वर्षांपूर्वीं झाला त्या प्रसंगानें सर्वांस आला.

## सुक्या मेव्याचें पाकीट.

ग्वालेर दरबारीं दीड तपाचा काल वावरल्यामुळें असो अथवा ते स्वतः म्हणतात त्याप्रमाणें त्यांच्या मातुश्रींच्या स्वभावाचा उतरलेला अंश म्हणून म्हणा नानासाहेबांचा स्वभाव गोडवा, प्रेमळ, निगर्वी व निष्कपट असा आहे. त्यांचें वागणें, बोलणें, हंसणें प्रत्येक बाबतींत दरबारी अदब पूर्णपणें भिंबून गेलेली आहे. त्यांचें हास्य म्हणजे एक सदा सज्ज असें अमोघ अस्त्रच आहे. ऐन वादाच्या भरांत त्यांनीं हास्याची भंगली उठविली कीं चिडलेल्या त्यांच्या प्रतिपक्षानेंहि क्षणमात्र शांत व्हावें. त्यामुळें त्यांच्याशीं मतविरोध कसाहि तीव्र असला तरी त्यांच्याशीं कोणाचें पटेनासें होणें शक्यच नाहीं. खाजगी संभाषणाची जी पद्धति तीच जाहीर व्याख्यानाची आणि थोड्या फार फरकानें लिहिण्याचीहि तीच तऱ्हा. ते बोलूं लागले म्हणजे ऐकणारांनीं हंसतच रहावें इतकें मजेदार बोलतात. आणि कित्येकदां तर एकादा श्रोता हंसला आणि त्याला 'कांहो कां हंसला' असा प्रश्न केला तर 'काय कीं, नानासाहेब हंसले म्हणून हंसलों' असेंच उत्तर देणें भाग पडेल. मात्र या खेळीमेळीच्या प्रकारांत आपला मुद्दा मात्र ते कधींहि सोडावयाचे नाहींत. तथापि स्वमताचा हटवादी अभिमान मात्र त्यांच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं. त्यांचें भाषण म्हणजे अलीकडे 'सुक्या मेव्याच्या पाकिटांची' टूम निघाली आहे, तशा प्रकारचा स्वादिष्ट, रुचकर व पौष्टिक खुराकच होय. केव्हां त्यांत खडीसाखरेचा एकादा खडा लागेल तर केव्हां खारकेचा खडखडीत तुकडा; तर केव्हां बदामाचा चूर. बदाम हा पचण्यास जड असतो त्याप्रमाणें त्यांचे सिद्धांत सत्य परंतु पचावयास जड असतात. आणि सत्य हें कांहींकांना कटु लागतें तसा एकाद्याला या सुक्या मेव्यांत कडू बदामहि लागत नसेलच असें सांगतां येत नाहीं! संदेशकार कोल्हट-

करांनीं मागें एकदां त्यांच्या लिहिण्याबोलण्याचें समर्पक वर्णन केलें होतें तें असें: " श्री. चिं. वि. वैद्य यांच्या भांडारांत खुर्दा, नाणें, मोहरा, जडजवाहीर इवें तेवढें खेंचून भरलेलें असतें परंतु त्याची व्यवस्थित विल्हेवारी लावण्याकडे प्रायः त्यांचें दुर्लक्षच असतें. " खाजगी संभाषणाबद्दल बोलावयाचें तर त्यांचा स्वभाव गोष्टी-वेल्हाळ आहे असें म्हटल्यास चिंता नाहीं. ' ती अतिशय मजेदार हकीकत आहे, ' ' त्यांचा आमचा मोठा तंटा ' अशी त्यांनीं सुरवात केली कीं ऐकणारानें तासंतास कान टवकारून ऐकतच रहावें. मग कोठल्या कोठल्या हकीकती आणि गमती निघतील सांगतां यावयाचें नाहीं. एकादें तितकेंच निकडीचें काम निघालें तरच ही समाधी उघडावयाची ! टिळक महाविद्यालयांत शांकर भाष्यावर निरूपण असो अथवा संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासाचें अध्यापन असो विद्यार्थी विषयाचें नांव न उमगलें तरी तास तास दोन दोन तास तल्लीनतेनें ऐकत रहावयाचे, हा लेख-काचा स्वानुभव आहे. कोणी मध्येंच अप्रस्तुत शंका अगर प्रश्न विचारला तर न चिडतां ' यांना चांगलें समजलेलें दिसतें, याहो पुढें या ' असें यांनीं म्हणावें आणि त्या विद्यार्थ्याच्या स्वभावानुरूप त्यानें पुढें येऊन बसावें अगर आपल्या जागेवरच बैठक मारावी. असो. नानासाहेबांसंबंधानें विशेष महत्त्वाचें म्हणून जें लिहावयाचें असें मनांत होतें तें लिहून झालें.

आरंभीं म्हटल्याप्रमाणें हें चरित्र नसून चरित्रसार आहे. नानासाहेबांच्या पुढें अद्याप अनेक उद्योग त्यांच्या दुर्दम इच्छाशक्तीनें उभे केलेले आहेत. आणि त्यांपैकीं कांहीं इतके प्रचंड आहेत कीं त्यांच्या वयाच्या दुसऱ्या कोणी क्वचितच ते मनांत आणले असते. हे सर्व उद्योग पुरे पाडण्यास लागणारें आयुरारोग्य नानासाहेबांस लाभो, अशी ईश्वराची प्रार्थना करून आम्ही हें पुण्य स्मरणाचें कार्य संपवितों.

RFFBK-0004388

632

## विद्यार्थ्यांकरतां उत्कृष्ट नाटकें.

विक्रीस तयार.

### संगीत धन्य बालवार

किंमत १२ आणे.

लवकरच मिळेल.

### हेंच तें शिक्षण.

लेखक-श्री. मो. वा. दोंदे.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:—

अरुणोदय प्रेस, ठाणें.

# शांततेचा शाहीर.

[ प्रे. विलसन यांचें चरित्र. ]

ले.—धुंडिराज त्र्यंबक गद्रे.

किं. १ रु.

मिळणेचा पत्ता—सहस्रबुद्धे आणि मंडळी, कल्याण;
महाराष्ट्र पब्लिशिंग हाउस, पुणें.

मुद्रक व प्रकाशक—धोंडो काशिनाथ फडके, अरुणोदय प्रेस, स्टेशन रोड, ठाणें.